महापालिका निवडणूकीत कुणाचे वर्चस्व?

कुणाला उमेदवारी मागायची ? | महायुती की महाविकास आघाडी | इच्छुक उमेदवार बुचकळ्यात

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.1) - नुकत्याच विधानसभा निवडणूका पार पडल्याने आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकाही लवकरच होती, अशी आशा पल्लवीत झाल्या आहेत. मात्र गेल्या 3 वर्षांपासून निवडणूकीची तयारी करित असलेले इच्छुक उमेदवार चांगलाच बुचकळ्यात असल्याचे जाणवत आहे. महायुतीला विधानसभेत मिळालेल्या अभूतपुर्व यशामूळे महाविकास आघाडीमध्ये कार्यरत पुढाऱ्यांच्या पायाखालील वाळू सरकली आहे. आपले अर्धे आयुष्य महापालिकेत नगरसेवक म्हणून काढणाऱ्या प्रस्तापितांनाही गाशा गुंडाळण्याची वेळ येणार असल्याचे दिसत आहे.

महायुती व महाविकास आघाडीमध्ये नसलेले इच्छुक उमेदवार आपल्याला कोण तिकीट देणार याची सेटिंग आतापासून लावण्याकरिता धडपड करित आहेत. विधानसभा निवडणुकीमध्ये भाजप, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या तिन्ही पक्षांच्या महायुतीला अभूतपूर्व यश मिळाल्याने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नेमकी कुणाची कास पकडायची असा संभ्रम इच्छुक उमेदवारांमध्ये निर्माण होताना दिसत आहे. महाविकास आघाडीत काम करत असताना महायुती मधून आपल्याला कोण तिकीट देणार, कोणत्या पुढार्या कडून आपल्याला तिकीट मिळू शकते याचे जुगाड लावण्याचा प्रयत्न आतापासून इच्छुक उमेदवाराकडून केल्या जात आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये 'आतून मी आपलेच काम केले' असे पॉलीसी नवनिर्वाचित आमदारासमोर करण्याचा प्रयत्नही इच्छुकांकडून होत आहे.

पंस, जिप, नप ही टार्गेट

विधानसभा होतात सर्वांना स्थानिक स्वराज्य संस्थांचे निवडणुकीचे वेध लागले आहे. त्यामध्ये पंचायत समिती, जिल्हा परिषद व नगरपालिका, महानगरपालिकेचा समावेश आहे. राज्याच्या सत्तेत नाही तर निदान स्थानिक स्वराज्य संस्थेचे सूत्र आपल्याकडे रहावे या प्रयत्नात महाविकास आघाडी जरूर रात्रीचा दिवस करेल यात दुमत नाही, परंतु अंजनगाव सुर्जी वगळता संपूर्ण विधानसभा मतदारसंघ महायुतीच्या ताब्यात असताना महाविकास आघाडीला कुठेच हात न मारू देण्याचा प्रयत्नही महायुती करेल यात शंका नाही. त्यामुळे सर्वांचे लक्ष आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर लागलेले आहे. या निवडणुका घोषित होताच पुन्हा एकदा राजकारणाचा फड जोमाने रंगणार असल्याचे दिसत आहे.

गुप्तांचा उदो उदो करणारे आ.खोंडकेंच्या बाजूने

विधानसभा निवडणूकीत कालपर्यंत जगदीश गुप्ता यांच्या पाठीमागे फिरणारे भाजपचे काही कार्यकर्ते मोठमोठे होर्डिंग लावून आमदार सुलभा खोडके यांना विजयाच्या शुभेच्छा देतानाही दिसत आहे. हा सर्व प्रकार आगामी महापालिका निवडणुका डोळ्यापुढे ठेवून केल्या जात असल्याचे स्पष्ट दिसत आहे. आगामी निवडणुकांमध्ये अनेक 'बेरक्या' लोकांची गोची होणार यात दुमत नाही.

महापालिका निवडणूकीवर प्रभाव कुणाचा ?

अमरावती आणि बडनेरा असे दोन्ही विधानसभा मतदारसंघाचा मोठा भाग महानगर पालिकाअंतर्गत येते. या विधानसभेपासून अधिक बलाढ्य झालेले आ.रवी राणा व नवनीत राणा हे महापालिका ताब्यात घेतात की, पुन्हा एकदा आपल्या विजयाचा झेंडा अमरावती विधानसभा मतदारसंघावर फडकविणाऱ्या आ.सुलभा खोडके यांचे वर्चस्व महापालिकेत राहते, हे पाहण्यासारखे राहील. हे दोन्ही कट्टर विरोधक महायुतीमध्ये असल्याने आपआपले समर्थकांना कसे नगरसेवक बनविता येईल, याचा प्रयत्न ते करतील. परंतू भाजपमध्ये या दोघांचेही समर्थक आगामी महापालिका निवडणूकीमध्ये उभे राहणार असल्याने कोण हिताचे, कोण अहिताचे यात विभागणी करणे खोडके व राणा गटाला भारी जाणार आहे.

महाविकास आघाडी काय खेळ करणार

दुसरीकडे विधानसभा निवडणूकीत पराभूत झालेल्या महाविकास आघाडीमधील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) व उबाठा शिवसेना महापालिकेत विजय मिळवण्याकरिता काय खेळ हे पाहण्यासारखे राहील.

दोन जणांची 10.53 लाखाने फसवणूक

- शिक्षक आणि वितरकाचा सहभाग
- सायबर सेलमध्ये गुन्हा दाखल

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 1) शहरातील दोन जणांनी सायबर गुन्हेगारांनी तब्बल 10 लाख 53 हजाराने फसवणूक केली. एकाची फँचायझी देण्याच्या नावाखाली 5.53 लाख रुपयांची ऑनलाइन फसवणूक करण्यात आली, तर दुसर्याला मनी लॉंड्रिंगच्या गुन्ह्यातून बाहेर काढण्याची बतावणी करून 4 लाख 99 हजाराने गंडविण्यात आले आहे. या दोन्ही प्रकरणात सायबर पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुध्द गुन्हे नोंदवून, तपास सुरु केला आहे.

फ्रेंचायझीने खोटी कागदपत्रे पाठवली

वितरक कृष्णगोपाल विनोदकुमार पांडे (47, रा. विन्सपार्क, शेगाव नाका संकुल) यांनी ऑनलाइन जाहिरात पाहिली होती. त्यांना फँचायझी हवी होती, त्यामुळे त्यांनी टाटा झुडीओ फँचायझीशी संपर्क साधला. त्यावर संबंधित अज्ञात व्यक्तीने फॅचायझी देण्याची खोटी बतावणी केली. त्यानंतर पांडे यांना ऑनलाइन खोटी कागदपत्रे पाठवली. कागदपत्रे पाहून पांडे यांना विश्वास बसला. त्यानंतर कृष्णगोपाल यांनी अज्ञात आरोपीच्या इंडियन बँक खात्यात 5 लाख 53 हजार रुपये ऑनलाइन पाठवले. परंतू त्यानंतर त्यांनी संबंधित व्यक्तीशी संपर्क साधला असता कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे पांडे यांच्या लक्षात आले. ही घटना 24 ऑक्टोबर 2024 ते 29 ऑक्टोबर 2024 दरम्यान घडली. या घठनेची तक्रार कृष्णगोपाल यांनी सायबर सेल पोलिस ठाण्यात 30 नोव्हेंबर रोजी दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

शिक्षकाची 4.99 लाख रुपयांने गंडा

शहरातील रहमत नगर येथे राहणारे शिक्षक अब्दुल मतीन अब्दुल वहाब (45) यांना 4 नोव्हेंबर रोजी अनोळखी क्रमांकावरून फोन आला. त्यावेळी अज्ञात आरोपींनी ते दूरसंचार विभाग आणि गुन्हे शाखेचे अधिकारी असल्याचे सांगितले. त्यानंतर मनी लॉंड्रिंगमध्ये तुझे नाव आले आहे, असे सांगून अब्दुल मतीनला धमकी दिली. या खोट्या प्रकरणातून बाहेर पडण्यासाठी आरोपींनी पैशांची मागणी केली. या घटनेने अब्दुल मतीन हे चांगलेच घाबरले होते. त्यामुळे त्यांनी आरोपींच्या म्हणण्यानुसार त्यांनी मल्टीप्लाय एंटरप्रायझेस आणि मासेमारी व्यवसायाच्या बँक खात्यात एकूण 4 लाख 99 हजार 971 रुपये जमा केले. परंतू त्यानंतर लक्षात आले की, आपली फसवणूक झाली आहे. त्यामुळे शिक्षक रहमत खान यांनी 30 नोव्हेंबर रोजी सायबर पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार केली.

चारित्र्यावर संशय घेऊन सब्बलने मारहाण

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 1) - चारित्र्याच्या संशयावरून एका महिलेवर सब्बल वार करून तिला जखमी केल्याची घटना 29 नोव्हेंबर रोजी रात्री 10.30 वाजता वरुड पोलीस ठाणे हद्दीतील शहापूर येथे घडली. महिलेच्या वडिलांच्या तक्रारीवरून पोलिसांनी तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

वरुड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रहिवासी असलेले 66 वर्षीय वडील तक्रारदार आपल्या मुलीसह घरी होते. तेवढ्यात आरोपी प्रफुल्ल रमेश पठाणकर तेथे आला. त्याने महिलेच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला शिवीगाळ व मारहाण करण्यास सुरुवात केली. दरम्यान, वडील त्यांचे भांडण सोडवण्यासाठी गेले असता आरोपी प्रफुलने त्यांना शिवीगाळ करत काठीने मारहाण करण्यास सुरुवात केली. त्याने महिलेच्या डोक्यावर सब्बलने वार करून तिला जखमी केले आणि जीवे मारण्याची धमकी देऊन घरातून निघून गेला. त्यानंतर वडिलांनी मुलीला रुग्णालयात दाखल केले आणि त्यांनी वरुड पोलीस ठाण्यात जाऊन आरोपीविरुद्ध फिर्याद दिली. पोलिसांनी प्रफुल्ल पठाणकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

चारही संशयीतांना चार दिवसाची वन कोठडी

वाघाच्या हत्येचे प्रकरण

महासागर प्रतिनिधी

चुरणी, (दि.1) - अंजनगाव सुर्जी वनपरिक्षेत्र अंतर्गत पांढराखडक गावानजीक जंगलात कंपार्टमेंट नंबर 1032 मध्ये 26 नोव्हेंबर रोजी मृत अवस्थेत आढळलेल्या वाघाची शिकार झाल्याच्या संशयावरून चार आरोपींना अटक करण्यात आली होती. यामध्ये अकोट तालुक्यातील बल्लाखेडा येथील चार लोकांना वन विभागाने काल ताब्यात घेतले होते. या चारही आरोपींना आज (दि.1) रोजी

अचलपूर कोर्टात हजर करण्यात आले. वनविभागाने या आरोपींना चार दिवसाची वन कोठडी मागितली न्यायालयाने चार दिवसाची वनाकोठाडी मंजूर केली. दरम्यान या प्रकरणात आणखीन आरोपी वाढण्याची शक्यता आहे. प्रादेशिक वन विभाग परतवाडा यांच्यामार्फत वाघ शिकार प्रकरणाची चौकशी कसून सुरू आहे. या वाघाची शिकार कधी व कशी करण्यात आली? वाघाचे कापलेले पंजे कोठे आहेत, नखं कुणाला विकली? आदी प्रश्नांची उत्तरे मिळणे अद्याप बाकी आहे. पांढराखडक परिसरात सध्या वनविभागाचे पथक गस्त घालत असून वाघ शिकार प्रकरणाची मोठ्या प्रमाणात चौकशी सुरू असल्याची माहिती आहे.

> "चार आरोपींना वनविभागाने अटक केली असून चारही आरोपींना आज अचलपूर न्यायालयातून वनकोठडीची मागणी केली होती. 4 डिसेंबर पर्यंत वनकोठडी आरोपींना मिळाली आहे, अशी माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी अंजनगाव बावनेर यांनी दिली आहे.

त्या अल्पवयीन मुलीचा शोध घेण्यास बेनोडा पोलीस 'फेल'

तक्रार घेण्यासाठी लावले अवघे चार दिवस

महासागर प्रतिनिधी

वरुड,(दि.1) - बेनोडा शहीद पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या बारगाव येथील अल्पवयीन मुलगी ही मागील पाच-सहा दिवसापासून बेपत्ता झाली आहे. वरुड येथे आयटीआयमध्ये जातो म्हणून घरून निघून गेल्यानंतर ती परतलीच नाही. तिच्या कुटूंबियांनी तिची शोधाशोध केल्यावर तिचा पत्ता लागू शकला नाही. अखेर कुटूंबियांनी बेनोडा पोलिसांकडे तक्रार दाखल करण्याचा निर्णय घेतल्यावर बेनोडा पोलिसांनी त्यांना वरुड पोलिसांकडे पाठविले. तर वरुड पोलिसांनी त्यांना परत बेनोड्याला पाठवून त्यांना प्रचंड मानसिक त्रास दिला. यामध्येच चार दिवस लोटून गेले, अखेर बेनोडा पोलिसांनी तक्रार दाखल करून घेतली असली तरी अद्याप पर्यंत त्या अल्पवयीन मुलीचा शोध घेऊ शकले नाही. त्यामूळे बेनोडा शहीद पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

प्राप्त माहितीनुसार, तालुक्यातील बारगाव येथील एक अल्पवयीन मुलगी वरुड येथील आयटीआय मध्ये शिकत होती. ती नेहमीप्रमाणे आयटीआयमध्ये जात असल्यामुळे कुटूंबियांनी तिला गांभीर्याने घेतले नाही. मात्र ती संध्याकाळपर्यंत ती घरी परतली नसल्यामुळे कुटूंबियांनी तिचा शोध घेतला.

परंतु ती कोठेही मिळून आली नाही. अखेर कुणीतरी तिला फुस लावून पळून नेल्याची तक्रार दाखल करावी लागली. प्रथम ही तक्रार वरुड येथे दाखल करण्यासाठी नातेवाईक गेले असता त्यांनी बेनोडा पोलीस स्टेशनला जाण्याचा सल्ला दिला. तर बेनोडा शहीद पोलीस स्टेशन ने घटना वरुडची असल्यामुळे ती वरुड मध्ये दाखल करण्याचा अजब सल्ला दिला. यामध्येच नातेवाईकांचे चार दिवस निघून गेले, शेवटी नाईलाजास्तव बेनोडा शहीद पोलिसांनी तक्रार दाखल करून घेतली. परंतू मुलीला शोधण्याकरिता पाहीजे तश्या हालचाली करण्यात आल्या नसल्याचे नातेवाईकांचे म्हणणे आहे. त्यामुळे बेनोडा शहीद पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्या मुलीच्या जीवाला धोका असल्याची शक्यता टाळता येत नसल्याने पोलिसांनी तातडीने तिचा शोध घ्यावा अशी मागणी मुलीच्या नातेवाईकांकडून करण्यात आली आहे.

तपास सुरू आहे

बारगाव येथील त्या अल्पवयीन मुलीच्या कुटुंबीयांकडून तक्रार दाखल करून घेतली आहे. त्यानुसार आम्ही तपास सुरू केला आहे, तिचा मोबाईल बंद असल्यामुळे लोकेशन घेणे अवघड होत आहे. कोणताही नंबर टाकू मोबाईल सुरू झाल्यानंतर तिचा शोध घेणे सोयीस्कर होईल. असे बारगाव येथील बीट जमादार हरीश नागापुरे व पोलीस शिपाई निलेश डफळे यांनी सांगितले.

सीताबाई संगई शाळेला अल्पसंख्यांक प्रवेशाचा कोटा च नाही!

शिक्षण विभागाने आपल्या अहवालात केले स्पष्ट ■ मुख्याध्यापकांची वेतनवाढ रोखण्याचे निर्देश

महासागर प्रतिनिधी

अमरावती/अंजनगाव सुर्जी,(दि.1)- अंजनगाव सुर्जी येथील सीताबाई संगई शाळा नेहमी वेगवेगळ्या कारणांनी वादाच्या भोवऱ्यात सापडत असते. आता पुन्हा एका वादाने संगई शाळा चर्चेत आली आहे. शिक्षण विभागाकडून माहिती अधिकारात प्राप्त माहितीमध्ये या शाळेला अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा कोटा च (आरक्षण) नसल्याचे समोर आले आहे. शिक्षण विभागाने आपल्या अहवालात हा प्रकार चव्हाट्यावर आणला आहे.



सीताबाई शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्याकरिता पालकांना संस्था संचालकांचे उंबरठे झिजवावे लागते. पालकांचा आरोप आहे की, संस्था चालक आरक्षीत कोट्याच्या नावावर अनेक पालकांकडून आज पर्यंत डोनेशन घेत आले. आम्हाला अल्पसंख्यांक कोटा आहे, त्यामुळे 50 टक्के विद्यार्थी आम्ही अल्पसंख्यांक कोट्यातून भरतो व राहिलेले विद्यार्थ्यांची लकी ड्रॉ पद्धतीने प्रवेश करतो, असे दरवर्षीच संस्था चालकाकडून सांगण्यात येते. वास्तवात अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त शाळेमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याकरता संस्थाचालक यांच्यासाठी कोणताही राखीव कोटा नसल्याचे शासन आदेशात नमूद करण्यात आले आहे.

तसेच संस्था चालकांनी विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेत कोणताही हस्तक्षेप करू शकत नाही, असेही सांगण्यात आले आहे. राखीव कोटा मंजूर नसल्याने व राखीव कोट्यातून कोणत्याही प्रकारचा विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया करू नये असे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बुध्दभूषण सोनोने यांनी एका पत्रव्दारे सीताबाई संगई शाळेला स्पष्टपणे कळविले आहे. अजूनही काही विद्यार्थ्यांना अल्पसंख्याक कोट्यामधून प्रवेश दिल्याची माहिती आहे.

मुख्याध्यापकांची वेतन वाढ रोखा!

तक्रारकर्ते कुशल चौधरी यांनी सांगितले की, गेल्या दोन ते तीन वर्षापासून सीताबाई संगई शाळेत मोठ्याप्रमाणात गैरप्रकार होत आहे. प्रवेश शुल्काच्या नावावर गरीब विद्यार्थ्यांकडून 3 हजार रुपये प्रती विद्यार्थी डोनेशन घेतले जात आहे. याप्रकाराची पुरावेनिशी शिक्षण विभागाला तक्रार दिल्यावर, शिक्षणाधिकाऱ्यांनी यावर तीन सदस्यीय समिती नेमून या प्रकाराची चौकशी केली. ज्यामध्ये शाळा मुख्याध्यापक व व्यवस्थापन दोषी आढळले. शिक्षणाधिकाऱ्यांनी याप्रकरणी मुख्याध्यापकांची तात्पुरती वेतन वाढ रोखण्याचे आदेश दिले आहे. तर शाळेची मान्यता रद्द करण्याचा इशाराही शिक्षण विभागाकडून देण्यात आला आहे.

आरटीई प्रवेशातही शुल्क वसुली

शिक्षणाचा अधिकार 2009 मध्ये कुठल्याच प्रकारचे आरक्षण नमूद नाही, त्यामुळे संस्था अंतर्गत कोटातून केलेली विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया ही नियमबाह्य असून पारदर्शक प्रवेश प्रक्रियेचे पालन मुख्याध्यापकांनी व संगई संस्थेने केलेले नाही असे शिक्षण विभागाच्या चौकशी अहवालात नमूद केले आहे. दिनांक 24/8/2010 च्या शासन निर्णयामधील मार्गदर्शक तत्त्वानुसार 100 टक्के अनुदानित शाळेतील पालक, शिक्षक संघाने पालकाकडून सहयोग राशी जमा करण्याचा घेतलेला ठराव अधिकृत ठरत नाही. तसेच शाळेने व संस्थेने विद्यार्थी प्रवेशा करीता पालकाकडून जमा केलेली सहयोग राशी ही बाब कॅपिटेशन फिक्टचे उल्लंघन करणारे आहे. शिक्षणाचा अधिकार 2009 अंतर्गत नमुना दोन अन्वये शाळेस दिलेल्या मान्यतेमधील अट क्रमांक 5 चा भंग झालेला आहे. तसेच संस्थेस शाळेतील विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेमध्ये कोणताही कोठा राखीव कोटा मंजूर नसल्याने संस्थेने राखीव कोट्यातून प्रवेश प्रक्रिया करू नये ही बाब विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया कालावधीत कार्यालयाच्या दर्शनी भागात नोटीस बोर्डवर लावण्याचे आदेश शिक्षण विभागाने सिताबाई संघई संस्थेला दिले आहे. तसेच संघई संस्थेला कडक निर्देश दिले की जर आपण दोषी आढळल्यास आपल्या संस्थेवर कारवाई करण्यात येईल व शाळेची मान्यता सुद्धा रद्द करण्यात येईल, सीताबाई संगई शिक्षण संस्थेच्या गैरप्रकाराबाबत शासन काय कार्यवाही करते याकडे सर्व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि
VASTU HOUSING FINANCE
युनिट २०३ आणि २०४, दुसरा मजला, ए विंग, नवभारत इस्टेट, झकेरिया बंदर रोड, शिवडी (पश्चिम), मुंबई ४०००१५. महाराष्ट्र.
CIN No.: U65922MH2005PLC272501

ताबा सूचना

तर, आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अंतर्गत वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेडचे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरी आणि सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम २००२ च्या नियम ९ सह वाचलेल्या कलम १३ (१२) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना, खाली नमूद केलेल्या कर्जदारांना संबंधित नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम ही नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत परत करण्याचे आवाहन करणारी डिमांड नोटीस जारी केली आहे. रकमेची परतफेड करण्यात अयशस्वी झालेल्या कर्जदारांनी, खाली नमूद केलेल्या तारखेला नमूद केलेल्या नियमांच्या कलम १३(४) या कायद्याचे नियम ९ सह खाली नमूद केलेल्या तारखेला वाचले अंतर्गत मला दिलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा खाली स्वाक्षरीने घेतला आहे.

विशेषत: कर्जदार आणि जामीनदार आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे मालमत्तेचा व्यवहार न करण्याची खबरदारी देण्यात आली आहे आणि मालमत्तेचा कोणताही व्यवहार खाली नमूद केलेल्या रकमेसाठी वास्तु हाउसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड शाखेच्या शुल्काच्या अधीन असेल आणि त्यावरील व्याज, खर्च इ.

अ. क्र	कर्जदाराचे नाव, सह-कर्जदार आणि लेन क्र.	डिमांड नोटिसची तारीख आणि रक्कम	मालमत्तेचे वर्णन	तारीख आणि ताब्याचा प्रकार
1	भागवत आनंदा नागापुरे, कोंडाबाई भागवत नागपुरे, प्रेमदीप भागवत नागपुरे LP0000000088744	२०-ऑगस्ट-२४ रु. १६३०९७८ १४-ऑगस्ट-२४ रोजी	मालमत्ता नं ३६६ मौजे टोई, मौजे टोई, वाशिम, महाराष्ट्र, ४४४५०५, प्लॉट एरिया १५०० चौ.फू. बीएडी १३०४ चौ.फू	२८-नोव्हेंबर-२४ रोजी प्रतिकात्मक ताबा घेतला
2	विशाल बाळकृष्ण शिरभाते, संगिता विशाल शिरभाते Lp0000000080996	२०-ऑगस्ट-२४ रु. ११६६७०३ १४-ऑगस्ट-२४ रोजी	मालमत्ता क्र. २०५, मौजा मंगरूळ दस्तगीर, प्रभाग क्र. २, पत्रक क्र. ५, सिटी सर्व्हेक्र. ७०३/२, प्रागणे मजकूर, धामणगाव रेल्वे, धामणगाव रेल्वे, अमरावती, महाराष्ट्र, ४४४७११, सुमारे १९५.३० चौ.मी. आणि एएमपी, बिल्ड अप क्षेत्र ६०.३१ चौ.मी.	२७-नोव्हेंबर-२४ रोजी प्रतिकात्मक ताबा घेतला

तारीख: ०२.१२.२०२४
ठिकाण: वाशिम, अमरावती
अधिकृत अधिकारी
वास्तु हाउसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

साडेपाच महिण्यांच्या कालावधीनंतरही मेश्राम कुटूंबीय न्यायाच्या प्रतिक्षेत

कुटूंबाने दिला आत्मदहनाचा इशारा | मृतक नितेश मेश्रामच्या आईचे एसडीपीओंना साकडे

महासागर प्रतिनिधी

चांदूर रेल्वे,(दि.1)- पोलीस अटकेत असतांना घडलेल्या नितेश मेश्रामच्या मृत्युप्रकरणी चांदूर रेल्वे पोलीस स्टेशनमधील दोषी अधिकारी - कर्मचाऱ्यांवर खुनाचा गुन्हा तसेच ॲक्ट्रोसिटीचा गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कार्यवाही करण्याच्या मागणीसाठी मेश्राम कुटूंबीय साडेपाच महिण्यांपासून लढा देत आहे. मात्र न्याय मिळत नसल्याने अखेर मृतकाच्या आईने आता चांदूर रेल्वेचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांना शनिवारी (30) निवेदन देऊन येत्या 10 दिवसांत न्याय न मिळाल्यास थेट आत्मदहनाचा इशारा दिला आहे.

मृतक नितेश अशोकराव मेश्राम (30 वर्ष) याला 10 जुन रोजी पोलीस स्टेशन, चांदूर रेल्वे येथील पोलीस कर्मचारी यांनी रात्री अंदाजे 12 वाजताच्या दरम्यान घरून उचलुन नेले होते. तो कोर्टाच्या तारखेवर हजर नसल्यामुळे त्याचा वॉरंट निघाला होता. त्याला ताब्यात घेतल्यानंतर चांदूर रेल्वेच्या ग्रामीण रुग्णालयात मेडिकल करण्यात आले. मेडिकलमध्ये फिटनेस चांगले असल्यामुळे त्याला अटक करण्यात आली होती. दुर्स्या दिवशी त्याला अमरावती येथील कोर्टात हजर करण्यात आले. व त्यानंतर त्याला सेंट्रल जेल येथे रवाना करण्यात आले. मात्र 11 जून ते 13 जूनच्या कालावधीत त्याला जबर मारहाण करण्यात आली. त्याची तब्येत चांगली नसल्यामुळे व अंगावर जखमा असल्यामुळे सेंट्रल जेल प्रशासनाने त्याला इर्विन हॉस्पिटल, अमरावतीमध्ये रवाना केले व त्याचा इर्विन हॉस्पिटलमध्ये मृत्यु झाला असा आरोप मेश्राम कुटुंबाने केला. यानंतर 14 जुन ला अकोला येथे वैद्यकिय महाविद्यालय इन कॅमेरा शवविच्छेदन करण्यात आले, त्याचा शवविच्छेदन अहवाल 28 जुन रोजी संबंधीत तपास अधिकाऱ्यांना प्राप्त झाला. त्यामध्ये शरीरावर मारण्याच्या 16 जखमा असल्याने त्याचा मृत्यु झाला असा डॉक्टरांचा स्पष्ट अहवाल असतांना देखील पोलीस अधिकारी हे दोषी पोलीसांनाच वाचविण्याचा प्रयत्न करित आहे असे कुटूंबीयांचे म्हणणे आहे. त्यानंतर दुर्स्या मेडीकल रिपोर्टमध्ये पोटातील विषारीमुळे जीव गेला का ? याची तपासणी केली असता तो ही रिपोर्ट निरंक आला आहे. मृतक नितेश मेश्राम याच्या शरीरावर एवढ्या जखमा पोलीस कारवाईसाठी टाळाटाळ करीत असल्याचा आरोप मृतकाच्या आईने केला आहे. मेश्राम कुटूंबाने न्यायाकरीता ग्रामिण पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण केले असता या प्रकरणात तज्ञांचा अंतिम अहवाल तसेच व्हिसेरा रिपोर्ट आल्यानंतर दोषी आढळल्यास कारवाईचे लेखी आश्वासन 19 जुलै रोजी देण्यात आले होते. मात्र यावरही चार महिण्यांचा कालावधी लोटून कुठलीही ठोस कारवाई अद्याप झाली नाही. त्यामुळे पोलीस अधिकार्यांना त्रस्त होऊन आता मृतकाची आई वंदना मेश्राम यांनी चांदूर रेल्वेचे एसडीपीओ यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. येत्या 10 दिवसांत न्याय न मिळाल्यास आत्मदहन करण्याचा इशारा मृतकाची आई व कुटूंबाने दिला आहे. त्यामुळे आता तरी मेश्राम कुटूंबाला न्याय मिळणार का ? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

फलकलेखनातून मिळतेय सामान्य ज्ञान

ज्ञानगंगा उपक्रम : उत्तमसरा शाळेच्या उपक्रमातून विद्यार्थ्यांना बक्षिसांची मेजवानी

महासागर प्रतिनिधी

भातकुली, (दि.1) - प्रत्येक शाळेत फलक लेखनातून विद्यार्थ्यांना नवनवीन विषयांचे ज्ञानार्जन होते. पण जिल्हा परिषद माध्यमिक शाळा उत्तमसरातील विद्यार्थ्यांना शालेय विषयासह सामान्य ज्ञानाची माहिती तर मिळतेच याशिवाय सामान्य ज्ञानवर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धेचे उत्तरे दिल्यास बक्षीस सुद्धा प्राप्त होते. विज्ञान शिक्षिका शीतल भोपाळे (अथाटे) यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या %ज्ञानगंगा घरोघरी% या नवोपक्रमातून विद्यार्थी अधिक ज्ञानसमृध्द होत आहे.

नववर्षाचा संकल्प म्हणून शीतल भोपाळे ह्या शिक्षिकेने विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचा पाया मजबूत व्हावा म्हणून शाळेत दर्शनी भागातील फलकावर सामान्य ज्ञानावर आधारित %ज्ञानगंगा% हा उपक्रम सुरू केला. वर्गाबाहेरील फलकावर रोज सामान्य ज्ञानावर आधारित पाच प्रश्न दिले जातात. यामुळे दिवसभरात येता जाता विद्यार्थ्यांची नजर पडते. शिवाय अनेक विद्यार्थी हे प्रश्न वहीत लेखन करतात. दुसऱ्या दिवशी परिपाठात प्रश्नोत्तरे द्वारे याची उजळणी घेतल्या जाते. फलक लेखनावर आधारित उत्कृष्ठ वही लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून बक्षीस सुध्दा देण्यात येते. शिवाय सामान्य ज्ञान लेखनावर आधारित चाचणी द्वारा यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस दिल्या जाते. या उपक्रमकरिता शाळेतील मुख्याध्यापक लोमेश खैरकर, उमेश बसरे, संतोष कुरहेकर, चंद्र शेखर बाम्हणकर, अश्विनी झाडे, प्रतिभा नांदने, ज्योष्ना हायगले, भूषण बुरंगे प्राजक्ता भडके आदींचे सहकार्य लाभते.

फलक लेखनात समाविष्ट बाबी

सामान्य ज्ञान आधारित माहिती, संत, थोर माहात्म्य, सामान्य ज्ञानाच्या ट्रिक्स, गणिताच्या सोप्या ट्रिक्स, प्रश्न मंजुषा, दिनविशेष आदी विविधांगी माहितीचा समावेश.

उपक्रम पोहचला सर्वत्र

शाळेतील सामान्य ज्ञानावर आधारित फलक लेखनाचे फोटो समाज माध्यमावर टाकल्यावर इतरांना ते आवडले. उपक्रमाला दिवसेंदिवस प्रतिसाद मिळत असल्याने नवीन सत्रात सामान्य ज्ञानाबरोबरच एक चॅलेंजिंग क्वेश्चनचे उत्तर देणाऱ्याचे नावं उमटू लागल्याने स्पर्धा आणखी रंगतदार झाली. समाजमाध्यम वरील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन टेस्ट दिल्याने त्यांचाही समावेश वाढला. समाज माध्यमामुळे शाळेतील उपक्रम सर्वत्र पोहचू लागला.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी?

गावपुढाऱ्यांना लागले वेध

विलास पाटील

वरुड,(दि.1) - स्थानिक स्वराज्य संस्थांमधील रद्द करण्यात आलेले ओबीसी आरक्षणामूळे थंडबस्त्यात पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका कधी होतील? याकडे गावपुढाऱ्यांचे वेध लागले आहे.

गेल्या काही महिन्यापुर्वी लोकसभा आणि नुकत्याच विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. त्यामूळे गेल्या तीन वर्षांपासून प्रशासकांच्या ताब्यात असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका घेवून कधी मोकळ्या केल्या जातील असा प्रश्न नागरिक शासनाला करित आहेत. ग्रामीण भागातील अनेक कामे हे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून केले जातात. या संस्था तीन वर्षांपासून प्रशासकांच्या ताब्यात आहेत. मे महिन्यात लोकसभा निवडणूक पार पडल्यानंतर सगळ्यांच्या नजरा या जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिका निवडणूकीकडे लागल्या होत्या. निवडणुका पावसाळ्यात होतील की हिवाळ्यात याच विवंचनेत नेते मंडळी असताना विधानसभेच्या निवडणुका लागल्या. त्याही आता आठ दिवस होऊन पूर्ण झाल्यानंतर मुख्यमंत्री निवडीची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यानंतरच जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिकेच्या निवडणुका होईल अशी आशा सर्वांना आहे. मात्र मुख्यमंत्री पदाचा तिढा सुटल्याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणे शक्य नाही. त्यामुळे राज्याचा मुख्यमंत्री बसल्यानंतरच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होतील, असे संकेत सत्ताधारी पक्षाकडून मिळत आहे. त्यामुळे सत्ताधाऱ्यांबरोबरच विरोधी पक्षातील नेतेमंडळी सुद्धा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीकरिता कामाला लागले आहे. काही नेत्यांच्या मतदारांच्या भेटीगाठी घेणे सुरू केले आहे. कोणता पक्ष कोणाला उमेदवारी देणार हे जरी ठरले नसले तरी मात्र संभाव्य उमेदवार म्हणून मतदारांच्या भेटी गाठी घेणे सुरू झाल्याचे चित्र वरुड तालुक्यात दिसून येत आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक आयोगाने जाहीर करून जानेवारी 2025 मध्ये निवडणुका घ्याव्यात अशी चर्चा आता जोर धरू लागली आहे. मात्र निवडणूक आयोग काय निर्णय घेईल यावर सर्व विसंबून राहील.

पालखी निघाली, पालखी निघाली, भक्तासंगे गजानन माऊली निघाली!

टाळ, मृदंगाच्या गजरात पायदळ वारी शेगावकडे रवाना | श्री समर्थ गजानन महाराज संस्थानाचे आयोजन

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.1) - येथील समर्थ कॉलनी स्थित श्री समर्थ गजानन महाराज संस्थानाकडून आयोजित पायदळ वारी आज(दि.1) शेगावकडे रवाना झाली. पालखी निघाली, पालखी निघाली, भक्तासंगे गजानन माऊली निघाली या गिताच्या चालीवर ताल धरत सुसज्ज वारकरी गजानन महाराजांची पालखी खांद्यावर घेवून पायदळ वारीमध्ये सहभागी झाले होते. टाळ, मृदुंगाच्या गजराने यावेळी संपुर्ण समर्थ कॉलनीचा परिसर दणाणून गेला होता.

श्री समर्थ गजानन महाराज संस्थानाकडून दरवर्षी 1 डिसेंबरला या अमरावती ते शेगाव पायदळ वारीचे आयोजन करण्यात येते. गेल्या दोन वर्षांपासून या वारीत 200 महिला व पुरुष भक्त सहभागी होतात. तसेच चिमुकल्यांसह ज्येष्ठही या वारिमध्ये सहभागी होतात. 1 डिसेंबरला सकाळी 7 वाजता समर्थ कॉलनी येथून समर्थ गजानन महाराज संस्थानातून वारिचे प्रस्थान झाले

राठी नगर येथे प्रशांत गहुकर यांच्या घरी पालखीचे पूजन आरती करण्यात आली, तसेच सिकची रिसोड वलगाव येथे पालखीचे पूजन आरती करण्यात आली. त्याचबरोबर दीपक गुडदे खारतळेगाव यांच्या शेतात गुडदे परिवाराच्या वतीने स्नेहभजनाची व्यवस्था करण्यात आली आणि त्यांच्या शेतात अतिशय सुंदर सजावट करण्यात आली होती. पारंपरिक वाद्य बैल,बंडी सह सजावट करण्यात आली. टाळ मृदंगाच्या गजरात भक्तांनी ताल धरला होता. भावभक्तीमध्ये तेथून धामोरी या गावी निघाले. आज रात्री धामोरीत मुक्काम करुन पालखी आपल्या पुढच्या प्रवासाला निघणार आहे.

राजस्थान पोलिसांनी अमरावतीच्या एका महिलेची केली चौकशी

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 1) - राजस्थान पोलिसांनी 30 नोव्हेबर रोजी अमरावतीच्या फ्रेजरपुरा पोलिस स्टेशन हद्दीतील प्रिया कॉलनीतून एका महिलेला ताब्यात घेतले आहे. ही महिला राजस्थान येथील मुलांकडून पैसे घेऊन, त्यांना लग्नासाठी मुलगी उपलब्ध करून देत असल्याचा आरोप महिलेवर आहे. राजस्थान पोलिसांनी शनिवारी अमरावतीच्या फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात येऊन महिलेची चौकशी केल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. राजस्थानच्या स्वरूपगंज येथे राहणाऱ्या तरुणाने लग्नाच्या नावाखाली फसवणूक झाल्याची तक्रार पोलिस ठाण्यात दिली आहे. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी राजस्थान पोलीस फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात पोहोचले होते. येथून पोलिसांचे पथक प्रिया कॉलनीतील महिलेच्या घरी गेले. जिथे ती मुलगी देखील हजर होती. पोलिसांनी या महिलेला चौकशीसाठी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात आणले. पोलीस या महिलेची चौकशी करत आहेत. याप्रकरणी नागरिकांनी महिलेविरुद्ध फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

जुन्या वादातून रॉडने केला हल्ला

अमरावती- दर्यापूर पोलीस ठाणे हद्दीतील माहेश्वरी भवन येथून राजेश प्रीतमराम धारपवार (36) हे पुण्याला जाण्यासाठी निघाले होते. यावेळी आरोपी महेश चव्हाण आणि प्रशांत ठाकूर यांनी जुन्या वादातून त्यांना मारहाण केली. मुन्ना नावाच्या तरुणाने राजेश यांच्या डोक्यात लोखंडी रॉडने वार केले. यामध्ये

राजेश जखमी झाला. राजेशच्या तक्रारीवरून दर्यापूर पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

अविट सोलेभाजीची चवच भारी

घरोघरी धुम

नितीन दुर्बुडे

पथ्रोट,(दि.1) - ग्रामीण भागातील शेतशिवारात तुरीचे पीक बहरलेले असून, शेंग दाण्यांनी भरल्या. गावखेड्यातील घराघरात नियमीत सोलेभाजी बनवल्या जात आहे. वऱ्हाडातील ही खास सोलेभाजी तुरीच्या शेंगा सुकेपर्यंत अनेक तर्हेवने घरधनीन बनविते. ग्रामीण भागात सद्या घरोघरी तुरीचा सोलेभाजी महोत्सवच सुरू झाला असे वाटते. या मोसमी भाजीची चव भल्याभल्यांना भुरळ घालते.

हिवाळ्यात मिळणारा पौष्टिक व रुचकर घटक म्हणजे तुरीच्या शेंगा होय. तुरीच्या डाळीप्रमाणेच तुरीच्या शेंगादेखील भारतीय आहारात तितक्याच लोकप्रिय आहेत; शिवाय तुरीच्या दाण्यांपासून अनेक प्रकारचे तिखट, गोड, चटपटीत असे पदार्थ बनविले जातात. ही झणझणीत व चवदार भाजी भाकरीसोबत खाल्यास स्वर्गीय आनंदाची प्राप्ती होते.

नाना भागात नाना तऱ्हा

सोलेभाजीचे प्रकारही वेगवेगळे तुरीचे दाणे तव्यावर पातळ सोलेभाजी, सोले वांगे, सोले कोभी-आलु मिसळुन मिसळभाजी, सोले भात, मोकळे सोले, सोले कचोरी, सोले कढी गोळे असे एक ना अनेक प्रकारे भाजी केल्या जाते. भाजी व्यतीरिक्त ज्यास्त दाणे शिल्लक राहील्यास त्यांच्या वड्या बनवुन वाळवतात. पाण्यात मिठ टाकुन उकळलेल्या शेंगाही आवडीने खाल्ल्या जातात. महीला मजुर शेतातील कामं करुन शेंगा तोडतात प्रसंगी ओरपतात. शेतातुन आणलेल्या शेंगा सर्व महिला शेजारणीसह संवाद साधुन मिसळुन सहकार्याच्या भावनेने एकमेकीना शेंगेतील दाणे भाजीकरीता काढतात. शहरी भागात विकत मिळत असल्या तरी खेड्यापाड्यात या शेंगा शेतातुन आणल्या जातात. पुरुष मंडळी मात्र एकएक शेंग न तोडता झाडाच्या डहाळ्या च घेऊन येतात यास झाडणे असे म्हणतात. बाकी थंडीच्या काळात तुरीच्या सोले भाजीची धुम सुरु आहे. भारतासह इतर अनेक देशांमध्ये तुरीच्या दाण्यांबरोबरच तुरीच्या पानांचा, सालीचा, मुळांचा वापर औषधे, जनावरांसाठी खाद्य तसेच इतर जीवनावश्यक वस्तू बनविण्यासाठी केला जातो. तुरीचे दाणे मॅग्नेशिअम, फॉस्फरस, कॅल्शिअम व पोटॅशिअमचा उत्तम स्रोत आहे. यातील फोलेट या घटकामुळे अशक्तपणा दूर होण्यास मदत होते. रोगप्रतिकारक क्षमता वाढविण्यासाठी व हृदयाचे आरोग्य नियमित राहण्यासाठीही तूर फायदेशीर आहे.

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती

महासागर प्रतिनिधी

हिवरखेड(दि.1) - येथील नागोराव दादा सदाफळे नवोदय विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय मध्ये क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सविता ठाकरे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्विकारले. सर्वप्रथम महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्राची गजभिये, भावेश सातपुते, तन्मय महल्ले, आयुष वानखडे, मयूर सावरकर, तन्वी वाघाडे, कृष्णा तडस, अथर्व भुम्बर, जिविका वानखडे, माहेश्वरी ठाकरे, वैभवी सायगण, यश वानखडे, संस्कृती राऊत, श्रावणी काळे, अर्णव सातपुते, पद्मिनी अरतपायरे, आरुषी नेहारे, गुंजन भुजाडे, प्राची निस्वादे, ग्रीष्मा दंडाळे, ऐश्वर्या नेहारे, देवांत गावंडे,

भावेश महानकर, भक्ती वाट, महिमा महल्ले, सोनल सावळे, संस्कृती डवरे, यश जवंजाळ, हर्ष पाटील, ओम नवघरे, आयुष निचत, तेजस आमटे इत्यादी विद्यार्थ्यांची महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी भाषणे झाली. शेवटी सविता ठाकरे यांचे अध्यक्षीय भाषण झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विधी धोटे, प्रगती सातपुते यांनी केले. यावेळी प्रल्हाद बुले, संजय बोनडे, उमेश चव्हाण, श्रीकांत विघे, महादेव नागदिवे, सुनीता श्रीवास, स्वाती पारिसे, महादेव कदम उपस्थित होते.